ग्रामरोजगार सहाय्यकांच्या न्याय्य हक्कांसाठी आमदार सिद्धार्थ खरात मैदानात; कार्यालयासमोरच जीआरची प्रतीकात्मक होळी >> पान 2

विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांसाठी तज्ज्ञ समिती गठित >> पान 3

बळीराजाच्या हक्कासाठी आ. सिद्धार्थ खरात मैदानात! >> पान 4

# दैनिक आपला विदर्भ



मराठमोळ्या अभिनेत्री सैयामी खेरची आयर्नमॅनमध्ये हॅट्रिक; इटलीत रचला इतिहास... आतील पान

सुविचार
चांगलं बोलणं आणि चांगलं ऐकणं हे दोन्ही आपल्याला महान बनवतं.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलढाणा ■ वर्ष 05 ■ अंक 63 ■ शुक्रवार, दि. 25 सप्टेंबर 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मतचोरी करणारे देशद्रोही, या सगळ्यांना शिक्षा झाली पाहिजे: राहुल गांधी



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला. निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर राहुल गांधी यांनी वोट चोरीचा आरोप केला. महाराष्ट्र, हरियाणा आणि मध्य प्रदेश या राज्यात झालेल्या निवडणुकीवर राहुल गांधी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. भाजपा प्रत्येक निवडणूक जिंकते कशी ? असा सवाल राहुल गांधी यांनी यावेळी विचारला. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत राहुल गांधींनी सरकारवर हल्लाबोल केला.

काय म्हणाले राहुल गांधी : मतचोरी करुन सरकार सत्तेत आलं आहे. या प्रकरणात आरोपी असलेल्यांना आज ना उद्या शिक्षा करणारच आहे, इशारा राहुल गांधी यांनी आज दिला. ''देशात वोट चोरी आणि मतांची हेराफेरी सुरू आहे. मतदाराचं मत कुठं जाते हे तपासण्याची जबाबदारी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची असूनही त्यांनी प्रत्येक निवडणुकीत गोंधळ घातला. त्यामुळे हे देशविरोधी कृत्य आहे. संविधानावर झालेला हा हल्ला आहे. या प्रकरणी ज्ञानेश कुमार यांनी तत्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा,'' अशी मागणी राहुल गांधींनी केली.

लोकशाहीच्या मुळावर उठलेल्या या कारस्थानाला ज्ञानेश कुमार जबाबदार आहेत. निवडणूक आयोगातील दोन निवडणूक आयुक्तांनीच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयांवर आक्षेप नोंदवला आहे. त्यामुळे २०२४ ची निवडणूक आणि विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी झाल्याचं सिद्ध होते. याबाबत असलेला आमचा संशय खरा ठरला, असं राहुल गांधी यांनी यावेळी सांगितलं. या प्रकरणावरुन राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनाच लक्ष्य केलं. याबाबत बोलताना राहुल गांधी म्हणाले की, '' मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी निवडले आहेत. या कटाचे मुख्य सूत्रधार पंतप्रधान आणि गृहमंत्री आहेत. त्यामुळे ज्ञानेश कुमार यांना वाचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे या घटनेची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली.



## 'अँटी-इन्कम्बसी' म्हणजे काँग्रेसमधील नैराश्य; राहुल गांधी यांच्या आरोपांवर भाजपचे जोरदार प्रत्युत्तर

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक प्रक्रिया आणि मतदार याद्यांवर गंभीर आरोप केले होते. या आरोपांना भारतीय जनता पक्षाने अत्यंत आक्रमक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. भाजपचे राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी पत्रकार परिषद घेत राहुल गांधींच्या राजकीय समजुतीवर आणि दाव्यांवर जोरदार हल्लाबोल केला. ज्या पक्षाची स्वतःची पाळेमुळे उखडली आहेत, ते आता निवडणूक आयोगावर आणि पारदर्शक व्यवस्थेवर खोटे आरोप करत आहेत, असा पलटवार त्रिवेदी यांनी केला.

**राहुल गांधींचे राजकीय ज्ञान 'शून्य' – सुधांशू त्रिवेदी**

राहुल गांधींनी आपण ५० वर्षांपासून राजकारण समजून घेत असल्याचे वक्तव्य केले होते, त्यावर भाजपने जोरदार टोला लगावला. सुधांशू त्रिवेदी म्हणाले की, राहुल गांधी यांचे वय ५६ वर्षे आहे आणि ते म्हणतात की ते ५० वर्षांपासून राजकारण पाहत आहेत. वयाच्या ५-६ व्या वर्षी राजकारण समजण्याची ही अद्भुत प्रतिभा फक्त त्यांच्यातच असू शकते. प्रत्यक्षात राजकीयदृष्ट्या त्यांचे ज्ञान शून्य असून त्यांना भारतीय राजकारणाची कोणतीही मूलभूत माहिती नाही.

**'अँटी-इन्कम्बसी'वर काँग्रेसला खडे बोल**

राहुल गांधींच्या 'अँटी-इन्कम्बसी' (सरकारविरोधी लाट)



>> पान २

## ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याशिवाय पर्याय नाही; राज ठाकरेंची रोखठोक पोस्ट

**मुंबई । प्रतिनिधी :** केंद्रीय निवडणूक आयोगात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि त्यांचे सहकारी निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांच्यातील अंतर्गत मतभेदांमुळें नवा वाद निर्माण झाला आहे. गेल्या १० महिन्यांत दोन्ही आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांवर तब्बल १४ वेळा लेखी आक्षेप नोंदवले आहेत, अशी माहिती समोर आली. विशेष म्हणजे, एसआयआरच्या मुद्द्यावरून हे मतभेद झालेत.

दुसरीकडे, विरोधकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट करुन निवडणूक आयोगावर हल्लाबोल केला आहे.

राज ठाकरे यांची पोस्ट –

एका वर्तमानपत्राच्या मुख्य पानावरच्या बातमीने देशांत खळबळ उडवून दिली आहे. २०२५ च्या अखेरीस, महापालिका निवडणुकांच्या आधी जेंव्हा महाराष्ट्रातील विरोधी पक्षांचे नेते राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना भेटायचो तेंव्हाच लक्षात यायचं की, यांना कुठलेच अधिकार नाहीत. हे मी जाहीरपणे



अनेकदा बोललो आहे. निवडणूक आयोगाच्या कारभारावर मी आणि माझ्या पक्षाने उघडउघड शंका म्हणा आरोप म्हणा काहीही म्हणा, पण ते आम्ही केलेत. आम्ही जे बोलत होतो त्याची सत्यता या बातमीत तुम्हाला सापडेल.

राज्य निवडणूक आयोग सोडाच जिथे केंद्रीय निवडणूक आयोगातल्या २ आयुक्तांनाच गुंडाळून ठेवलं आणि त्यांना अंधारात ठेऊन किंवा त्यांच्या मताला अजिबात किंमत न देता जे निर्णय राबवले जात आहेत, यावरून एक गोष्ट स्वच्छ आहे, निवडणूक आयोग स्वायत्त असायला हवा हे आता पुस्तकापुरतं मर्यादित आहे. स्वायत्ततेची व्याख्या भारतीय जनता पक्षाच्या अधीन अशी असेल तर तो स्वायत्त आहे, अन्यथा नाही. निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी जे आक्षेप नोंदवलेत ते गंभीर आहेत,

>> पान २

## बँक कर्मचाऱ्यांचा २८ ते ३० सप्टेंबर दरम्यान संपाचा इशारा

**नागपूर :** पाच दिवसीय कार्यालयीन आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी देशभरातील बँक कर्मचारी २८, २९ आणि ३० सप्टेंबर रोजी तीन दिवसांच्या लाक्षणिक संपावर जाणार आहेत. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या नेतृत्वाखाली हा संप पुकारण्यात आला असून, देशभरातील सुमारे आठ लाख बँक कर्मचारी या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती बँक कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी डी. एस. गायकवाड यांनी दिली.

बँक कर्मचाऱ्यांना आठवड्यातून पाच दिवस कामकाजाची सुविधा मिळावी, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचा दावा कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे. सरकार आणि संबंधित यंत्रणांकडून वेळोवेळी आश्वासनं देण्यात आली; मात्र प्रत्यक्ष निर्णय घेण्यात आलेला नाही, असा आरोप संघटनांनी केला आहे. पाच दिवसीय आठवडा लागू केल्यास बँकिंग सेवेच्या वेळेत आवश्यक ते बदल करण्यास, तसंच कामाचे तास वाढवण्याची तयारी कर्मचारी संघटनांनी दर्शवली आहे. त्यामुळे ग्राहकांच्या बँकिंग सेवांवर परिणाम होऊ नये, यासाठी कामकाजाचं योग्य नियोजन करता येऊ शकतं, असा संघटनांचा दावा आहे.

२८ ते ३० सप्टेंबर या कालावधीत बँका बंद राहिल्यास ग्राहकांना काही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. विशेषतः सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचं प्रमाण कमी असल्यानं शेती आणि शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत.




## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी ४८ तासांच्या आत राजीनामा द्यावा

### कॉक्रोच जनता पार्टीची मागणी, आंदोलनाचा दिला इशारा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनावरून निवडणूक आयोगामध्ये मतभेद असल्याच्या माध्यमांतील वृत्तामुळं राजकीय खळबळ उडाली आहे. याच पार्श्वभूमीवर कॉक्रोच जनता पार्टीनं गुरुवारी राजधानीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात मोहीम सुरू केली असून, त्यांच्या राजीनाम्यासाठी ४८ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत, कॉक्रोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दिपके, सौरभ दास आणि आशुतोष रांका यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांवर देशाच्या लोकशाही व्यवस्थेला कमजोर करण्याचा आणि मोठ्या प्रमाणावर मतदार यादीत फेरफार केल्याचा आरोप केला. तसंच मुख्य



निवडणूक आयुक्तांनी निर्धारित वेळेत राजीनामा दिला नाही, तर कॉक्रोच जनता पार्टी दिल्लीतून देशव्यापी मोठं आंदोलन सुरू करेल, असा इशारा कॉक्रोच जनता पार्टीनं दिला आहे.

अभिजित दीपके म्हणाले, २०२४ च्या निवडणुकीत भाजपाला बहुमत मिळवता आलं नाही. बहुमत नसल्यामुळं भीतीचं वातावरण होतं. ४०० चा टप्पा ओलांडण्याची घोषणा दिल्यानंतर, त्यांच्या जागा २४० पर्यंत खाली आल्या. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की देशाचा मूड बदलत आहे आणि प्रादेशिक शक्ती जोरदारपणे पुढं आल्या आहेत. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे असोत, राष्ट्रवादी काँग्रेस, एम. के. स्टॅलिन, पिनारयी विजयन, अरविंद केजरीवाल किंवा ममता बॅनर्जी असोत, हे सर्व मुख्यमंत्री एकामागून एक हरले. हा योगायोग असू शकत नाही. यात एक पॅटर्न दिसतो. हे सर्व मुख्यमंत्री २०२४ मध्ये एकत्र आले आणि त्यांनी एकजुटीनं प्रचार केला. त्यांचा एकामागून एक कसा पराभव झाला? पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या जागेवरून ५० हजार मतं कमी करण्यात आली आणि त्यांचा अंदाजे १५ हजार मतांनी पराभव झाला. एम. के. स्टॅलिन यांच्या जागेवरून एक लाख मतं कमी करण्यात आली आणि ते अंदाजे ४५ हजार मतांनी पराभूत झाले. दिल्लीत अरविंद केजरीवाल यांच्या मतदारसंघातून ४० हजार मतं कमी झाली आणि ते सुमारे ४ ते ५ हजार

>> पान २

## अहिल्यानगरमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीला गालबोट; पोलिसांचा लाठीचार्ज, मंडळाच्या अध्यक्षाचा मृत्यू, भिंगार बंद

**अहिल्यानगर। प्रतिनिधी :** शहरालगतच्या भिंगार उपनगरात गणेश विसर्जन मिरवणुकीला रात्री गालबोट लागले. मिरवणुकीदरम्यान पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जनंतर दीपक वागसकर या तरुणाचा मृत्यू झाल्याचा आरोप गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. गुलाल उधळण्यावरून पोलीस आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला आणि त्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा दावा कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे.

या घटनेनंतर भिंगार परिसरात संतापाची लाट उसळली. उपअधीक्षक दिलीप टिपरसे आणि भिंगार पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या कारवाईमुळेच लाठीचार्ज झाला, असा आरोप मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पोलीस बाजू अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे दीपक वागसकर यांच्या मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेची परिस्थिती अधिकृत तपासातून स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

घटनेनंतर गणेश विसर्जन मिरवणूक जागेवरच थांबवण्यात आली. कार्यकर्त्यांनी भिंगार वेशीजवळ रस्त्यावर ठिय्या आंदोलन सुरू केले. अनेक गणेश मंडळांनी आपल्या गणेशमूर्ती रस्त्यावरच थांबवून ठेवल्याने प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला.

>> पान २

# शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री शेताच्या बांधावर ; शेतकऱ्यांना भरीव मदत देणार मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद पाटील

■ चिखली व सिंदखेडराजा तालुक्यातील बाधित गावांना पालकमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट

■ एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये; प्रशासनाला निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** पावसातील खंड, अनियमित पर्जन्यमान आणि त्यामुळे पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी थेट शेताच्या बांधावर पोहोचून पिकांची पाहणी केली. नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी तातडीने अचूक पंचनामे पूर्ण करावेत.





शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून बाधित शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी चिखली तालुक्यातील केळवद, मौजे मालगणी, बेराळा, वसंतनगर व सरंबा, तसेच सिंदखेडराजा तालुक्यातील सावरगाव माळ येथे शेताच्या बांधावर जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत पावसातील खंड, पिकांची सद्यस्थिती, उत्पादनावर होणारा परिणाम तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींची माहिती घेतली. जिल्ह्यातील पीक परिस्थिती व नुकसानीचा प्रशासकीय यंत्रणेकडून आढावा घेण्यात आला असून, त्याआधारे शासनस्तरावर लवकरच मदतीबाबत निर्णय होईल, असे ना. मकरंद पाटील यांनी सांगितले. नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे अचूक व वस्तुनिष्ठ पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. तसेच उपलब्ध पाणीसाठ्याचा सिंचनासाठी योग्य वापर करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री यांनी दिले.

**खडकपूर्णा धरणातील पाणीसाठ्याची पाहणी**

दौऱ्यादरम्यान सिंदखेडराजा तालुक्यातील खडकपूर्णा धरणाचीही पालकमंत्र्यांनी पाहणी केली. धरणातील सद्य पाणीपातळी, उपलब्ध पाणीसाठा तसेच सिंचनासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याची माहिती त्यांनी जाणून घेतली. पिण्याच्या पाण्याचे आवश्यक आरक्षण करून उपलब्ध पाण्याच्या वापराचे योग्य नियोजन व आराखडा तयार करावा, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी आमदार श्वेता महाले, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसीलदार विजय सवळे, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामरोजगार सहाय्यकांच्या न्याय्य हक्कांसाठी आमदार सिद्धार्थ खरात मैदानात; कार्यालयासमोरच जीआरची प्रतीकात्मक होळी

## जाचक अटींना विरोध; प्रलंबित मानधन तातडीने देण्यासह सेवा सुरक्षिततेसाठी सुधारित शासन निर्णयाची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**







**मेहकर । प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मानधन व सेवा अटींबाबत जारी केलेल्या सुधारित शासन निर्णयाविरोधात मेहकर तालुक्यातील ग्रामरोजगार सहाय्यक आक्रमक झाले आहेत. शासन निर्णयातील जाचक तरतुदींचा पुनर्विचार करून सेवा सुरक्षितता आणि प्रलंबित मानधनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, या मागणीसाठी विष्णु आखरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या जनसंवाद आमदार कार्यालयात आमदार सिद्धार्थ खरात यांची भेट घेऊन निवेदन दिले.

नवीन शासन निर्णयातील ११ महिन्यांच्या नियुक्तीची तरतूद, दरवर्षी निर्माण होणारी नियुक्तीची अनिश्चितता तसेच रोजगार हमीच्या कामावर होणारा संभाव्य परिणाम याबाबत ग्रामरोजगार सहाय्यकांनी आपली भूमिका मांडली. अनेक वर्षांपासून ग्रामपातळीवर सेवा बजावणाऱ्या सहाय्यकांच्या सेवा सातत्याचा प्रश्न निर्माण होत असल्याचे संघटनेने सांगितले.

तसेच प्रलंबित मानधन तातडीने अदा करण्याची मागणी करण्यात आली.यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मागण्यांना पाठिंबा देत शासन निर्णयातील आक्षेपार्ह तरतुदींचा पुनर्विचार करण्याची मागणी केली.

ग्रामरोजगार सहाय्यक हा ग्रामपंचायतीच्या कामकाजातील महत्त्वाचा घटक आहे. अकरा-अकरा महिन्यांच्या नियुक्तीच्या अनिश्चिततेत त्यांना ठेवणे योग्य नाही. त्यांच्या सेवा सातत्याचा प्रश्न शासनाने गांभीर्याने सोडवावा,अशी भूमिका त्यांनी मांडली. प्रलंबित मानधन तातडीने देण्याची मागणीही त्यांनी केली. शासन निर्णयातील संबंधित तरतुदींच्या निषेधार्थ आमदार कार्यालयासमोर ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या वतीने जीआरची प्रतीकात्मक होळी करण्यात आली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष, ग्रामरोजगार सहाय्यक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास २ ऑक्टोबर २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन व गटविकास अधिकारी कार्यालयासमोर बैठा सत्याग्रह करण्याचा इशारा संघटनेने दिला.

यावेळी नगराध्यक्ष किशोर गारोळे,तालुकाप्रमुख निंबाजी पांडव. युवा सेना तालुकाप्रमुख अँड आकाश घोडे. साहेबराव हिवाळे. श्याम निकम.अमोल बोरे. गोपाल गायकवाड सह ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेचे तालुकाध्यक्ष परमानंद अवसरमोल, उपाध्यक्ष किशोर निकम,सचिव विष्णु राठोड, प्रविण ठोकळ,मदन खरात, संजय मोरे, परमानंद जाधव, संतोष पागोरे, विनित वाघ, सुरेश राठोड, संदिप टेकाळे, भगवान अवसरमोल, उमेश जाधव, बाळू लठाड, शंकर देशमुख, सह ग्रामरोजगार सहाय्यक बांधव उपस्थित होते.

पान १ वरून...

### 'अँटी-इन्कम्बसी' म्हणजे काँग्रेसमधील नैराश्य;

दाव्यांची चिरफाड करताना त्रिवेदी यांनी भूतकाळातील आकडेवारी समोर ठेवली. ते म्हणाले की, अँटी-इन्कम्बसी ही फक्त भाजपविरोधी राहिलेली नाही, तर अनेक राज्यांतून काँग्रेस दीर्घकाळापासून सत्तेबाहेर आहे. तमिळनाडूमध्ये १९६७, पश्चिम बंगालमध्ये १९७७, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये १९९० आणि ओडिशामध्ये १९९९ पासून काँग्रेसची पुन्हा सत्ता आलेली नाही.

तसेच, २०१० च्या बिहार विधानसभा निवडणुकीचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, त्या निवडणुकीत काँग्रेस सर्व जागांवर लढली होती, परंतु त्यांना केवळ ४ जागांवर विजय मिळाला आणि तब्बल २३४ जागांवर त्यांच्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली होती.

पारदर्शक निवडणुकीमुळेच काँग्रेसची अडचण

निवडणूक प्रक्रियेवर बोलताना त्रिवेदी म्हणाले की, ज्या काळात मतदार ओळखपत्रे नव्हती, बुथ कॅप्चरिंग आणि बॅलेट बॉक्स लुटले जात होते, त्या काळात काँग्रेस वर्षानुवर्षे सत्तेत राहिली. परंतु, जेव्हापासून निवडणुका पारदर्शक झाल्या, सीसीटीव्ही कॅमेरे आले, केंद्रीय सुरक्षा दलांची नियुक्ती झाली आणि स्वतंत्र न्यायपालिका-मीडियाची भूमिका वाढली, तेव्हापासून काँग्रेसला सत्तेत येण्याचे वांधे झाले आहेत.

त्यांनी असाही आरोप केला की, खरी अँटी-इन्कम्बसी ही गांधी कुटुंबाच्या विरोधातच आहे. रायबरेली आणि अमेठीसारख्या पारंपरिक जागाही गेल्या २५ वर्षांपासून समाजवादी पक्षाच्या पाठिंब्याशिवाय ते जिंकू शकले नाहीत, तर वायनाडमध्ये त्यांना मुस्लिम लीगच्या आधाराची गरज लागते, असे ते म्हणाले.

मतदार याद्या आणि परदेशी निधीवर सवाल

वोटर लिस्ट आणि निवडणूक आयोगावरील आरोपांवर बोलताना त्रिवेदी म्हणाले की, ज्या मीडिया रिपोर्ट्सचा आधार घेतला जात आहे, त्यात कोणत्याही निवडणूक आयुक्तांचे थेट वक्तव्य नाही. १९५० च्या लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम २१(३) नुसार निवडणूक आयोगाला मतदार याद्यांचे पुनरावलोकन (डखठ) करण्याचा अधिकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, अमेरिकेच्या 'णड-खऊ' या एजन्सीच्या निधीवर आक्षेप घेत, भारतातील निवडणुकांसाठी परदेशी एजन्सींना फंडिंग घेण्याची गरज का भासते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याशिवाय

ते नाकारणं मुख्य निवडणूक आयुक्तांना म्हणजेच ज्ञानेश कुमारांना शक्यच नाही. त्यामुळे ते जे वागले यामागचा कर्ताकरविता नक्की कोण होता, आहे इतकं सांगितलं तरी पुरेसं आहे.

सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी या दोन निवडणूक आयुक्तांनी गेल्या १० महिन्यांत १४ वेळा निवडणूक आयोगाच्या कारभारावर ऑन रेकॉर्ड ताशेरे ओढले आणि तरीही ढिम्मपणे निवडणूक आयोगाला जे करायचं होतं तेच त्यांनी केलं. बरं म ुळात सध्या निवडणूक आयोगात एकूण तीन आयुक्त आहेत: एक मुख्य निवडणूक आयुक्त - ज्ञानेश कुमार आणि दोन निवडणूक आयुक्त - सुखबीर सिंग संधू व विवेक जोशी. यातल्या दोघांनी आक्षेप नोंदवलेत. याचा अर्थ मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे मनमानी करत निर्णय घेत होते, असं चित्र समोर येतं. पण, खरं तर त्यांना ते निर्णय घ्यायला लावले जात होते. बरं हे १४ महिन्यातले आक्षेप आहेत. ज्ञानेश कुमार यांची नियुक्तीच झाली फेब्रुवारी २०२५ ला म्हणजे आल्या आल्या त्यांनी त्यांच्या बॉसला खुश करायला सुरुवात केली.

इतर २ आयुक्तांनी जे आक्षेप नोंदवले ते थोडक्यात नोंदवतो, मतदार नोंदणी, नावं वगळणं आणि मतदारयादीच्या सॉफ्टवेअरशी संबंधित काही आदेश आयोगाच्या मंजुरीशिवाय निघाल्याचं त्यांनी लेखी म्हटलं आहे.

'फॉर्म ६' (एसआयआर) मध्ये अर्जदाराचं किंवा त्याच्या कुटुंबीयांचं नाव मागच्या एसआयरमध्ये होतं का असं विचारलं. हे विचारण्याचा अधिकार आयोगाला नाही. त्यासाठी कायद्यात बदल करावा लागेल, असं या दोघांचं म्हणणं होतं.

स्थानिक निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांची शक्ती पूर्ण कमी करून यादीत बदल करायचे, नाही करायचे याचा निर्णय जवळपास काढून टाकला गेला आणि यादीत बदल करण्यासाठी सॉफ्टवेअरमध्ये स्थानिक निवडणूक अधिकाऱ्याला जवळजवळ कुठलेच अधिकार उरले नाहीत.

गोव्यात स्थानिक अधिकाऱ्यांनी कागदपत्रं तपासून ९७ जण पात्र असल्याचं ठरवलं; पण सॉफ्टवेअरमध्ये त्यांची नावं परत समाविष्ट करण्याची सोय वेळेत उपलब्ध झाली नाही. परिणामी अंतिम यादीत त्यांची नावं आली नाहीत. अधिकारी मतदार पात्र आहे म्हणतो, तरी संगणकामुळे त्याचं नाव यादीत येत नसेल, तर जबाबदार कोण?

बॅलेट पेपरसाठी जनआंदोलनाचे आवाहन - निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेच्या रक्षणासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र यावे, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले. तसेच ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी मोठे जनआंदोलन उभारण्याचे आवाहनही त्यांनी केले.

### मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार

मतांनी पराभूत झाले.

सरकार निवडीच्या परंपरेवर परिणाम : पुढं अभिजित दिपके यांनी सांगितलं की, निष्पक्ष निवडणुका हा एक मोठा बनाव बनला आहे, हे निवडणूक आयोगाच्या कामकाजाबद्दलच्या अलीकडील माध्यमांतील वृत्तांनी हे सिद्ध केलं आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, दिल्ली, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक आणि तेलंगणा यांसारख्या राज्यांमधील मतदार यादीतून लाखो वैध मतदारांची नावं पद्धतशीरपणे वगळण्यात आली आहेत. याचबरोबर, ज्ञानेश कुमार यांनी मुख्य निवडणूक आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून देशातील सार्वजनिक सरकार निवडीच्या परंपरेवर परिणाम झाला आहे, असं अभिजित दीपके यांनी स्पष्टपणं सांगितलं. तसंच आकडेवारीचा हवाला देत त्यांनी असा युक्तिवाद केला की, कमी मतांच्या फरकानं निवडणूक होणाऱ्या राज्यांमधील अशा मोठ्या प्रमाणावरील नावं वगळणं हे प्रादेशिक पक्ष आणि प्रबळ विरोधी नेत्यांना कमकुवत करण्याच्या हेतुपुरस्सर राजकीय रणनीतीचा भाग आहे.

आयोगातील अंतर्गत मतभेद : निवडणूक आयोगाच्या इतर सदस्यांनीही अनेक निर्णयांवर आणि एसआयआर प्रक्रियेवर आपले मतभेद आणि आक्षेप व्यक्त केले होते, परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचं सौरभ दास यांनी सांगितलं. तसंच त्यांनी असा आरोप केला की, स्थानिक अधिकाऱ्यांचे (ईआरओ/एसडीएम) अधिकार मर्यादित होते आणि एका केंद्रीय सॉफ्टवेअरद्वारे सर्व नियंत्रण दिल्ली स्तरावर केंद्रित झाले होते.

### अहिल्यानगरमध्ये गणेश विसर्जन

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांनी रात्री दोन वाजेपर्यंत भिंगारमध्ये रस्त्यावर बसून ठिय्या आंदोलन केले. दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, संबंधित अधिकाऱ्यांची तत्काळ बदली करावी, अशी म ागणी कार्यकर्त्यांकडून करण्यात आली. मागण्या मान्य होईपर्यंत भिंगार बंद ठेवण्यासह गणेश विसर्जन न करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतल्याचे आम दार जगताप यांनी सांगितले

भिंगारमध्ये मोठ्या संख्येने गणेश मंडळं विसर्जनासाठी निघाली असताना अचानक निर्माण झालेल्या या तणावामुळे संपूर्ण विसर्जन मिरवणुकीवर परिणाम झाला आहे. रस्त्यावर गणपतीच्या मूर्ती थांबवून कार्यकर्त्यांचा ठिय्या आणि दुसरीकडे पोलिसांचा बंदोबस्त, अशी परिस्थिती रात्री उशिरापर्यंत कायम होती.

# विठ्ठलनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद; आमदार सिद्धार्थ खरात यांच्याकडून घाटबोरीच्या भजनी मंडळाला वारकरी साहित्याची भेट!

## टाळ-मृदंगाच्या निनादात आमदार कार्यालयात भक्तिमय वातावरण

**दैनिक आपला विदर्भ**




**मेहकर । प्रतिनिधी :**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या आमदार कार्यालयात दि २४ सप्टेंबर रोजी श्री मुक्ताई जगदंबा माता भजनी मंडळ, घाटबोरी येथील वारकरी माता-भगिनींनी सदिच्छा भेट दिली. यावेळी भजनी मंडळाच्या मागणीनुसार आमदार सिद्धार्थ खरात यांनी टाळ, वीणा आणि मृदंग हे वारकरी साहित्य भेट देत वारकरी संप्रदायाच्या भक्तीपरंपरेला पाठबळ दिले.

भजनी मंडळाच्या उपस्थितीत टाळ-मृदंगाचा निनाद आणि विठ्ठलनामाचा गजर झाल्याने आमदार कार्यालय परिसर भक्तिमय वातावरणाने भारून गेला. महाराष्ट्राच्या संतपरंपरेत वारकरी संप्रदायाला अनन्यसाधारण महत्त्व असून, भजन, कीर्तन, अभंग आणि वारीच्या माध्यमातून ही समृद्ध भक्तीपरंपरा आजही जपली जात आहे. वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची संस्कृती, संतपरंपरा आणि भक्तीची ओळख आहे. ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी वारकरी बांधवांच्या विधायक उपक्रमांना सदैव सहकार्य राहील, अशी भावना आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केली.

यावेळी नगराध्यक्ष किशोर गारोळे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवासेना तालुकाप्रमुख ॲड. आकाश घोडे, अमोल बोरे, साहेबराव हिवाळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्री मुक्ताई जगदंबा माता भजनी मंडळातील ह.भ.प. सौ. कलावती गजानन पाखरे, चंद्रभागा बाबुराव पाखरे, सौ. अयोध्या बबन सरडे, सौ. गीता कैलास पाखरे, सौ. ज्योत्स्ना राजू पाखरे, सौ. गोदावरी सुभाष येटे, सौ. नंदाबाई पांडुरंग तायडे, शोभाबाई प्रकाश पारवरे, सौ. सुनीताबाई पारवरे, सौ. विमलबाई मोहन राऊत, सौ. लिलाबाई विलास पारवरे, सौ. सुनीता भागवत पाखरे, सौ. अनिताबाई अरुण पाखरे, सौ. कविता दत्तात्रय चौकसकर, सौ. नेहा सतीश खरात, लक्ष्मी ज्ञानेश्वर पाखरे, सुनंदा गजानन दरेकर, गिताबाई भगवत पाखरे आणि नलुबाई भावराव वाघमारे यांची उपस्थिती होती. वारकरी संप्रदायाच्या या भक्तिमय भेटीने आमदार कार्यालयात काही काळ आध्यात्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

### काँग्रेसच्या नैतिकतेचा अस्त!

सर्वसामान्य माणसे ज्याकडे राजनीती म्हणून पाहतात, त्यामधील नैतिकतेचा केव्हाच अस्त झाला असून राजकारणाची संस्कृतीदेखील आता लयास चालल्याने भविष्यात देशातील राजकारण कोणती वळणे घेणार याची चिंता करण्याची वेळ येऊ लागली आहे. एके काळी राजकारणाची संस्कृती जपली जात होती. विरोधाच्या राजकारणातही सभ्यतेची पातळी सांभाळली जात होती. त्यामुळेच, राजकारणाविषयी सर्वसामान्यांच्या मनात कुतूहल, उत्सुकता आणि आपुलकीदेखील होती. काळ बदलत चालला, तसतसा सामान्यांच्या मनातून राजकारणाविषयीचा आदर उतरत चालला आणि राजकारण किंवा राजकारण्यांकडे पाहण्याची दृष्टीदेखील बदलत गेली. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर किंवा सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर आरोप करणे, कुरघोडीचे राजकारण करणे ही राजकारणाची नीतीच असली तरीही त्या नीतीने आपल्या मर्यादा ओलांडल्या की रसातळाचा कोणता थर गाठला जातो, याचे ताजे उदाहरण लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे सर्वेसर्वा राहुल गांधी यांनी त्यांच्या ताज्या विद्यार्थी संवाद कार्यक्रमातून देशासमोर उघड केले. गेल्या काही महिन्यांपासून 'जेन-झी'ची मने जिंकण्यासाठी आणि त्याद्वारे मतांची बेगमी करण्यासाठी राहुल गांधींच्या माध्यमातून 'छात्रों की गूंज' नावाचा कार्यक्रम काँग्रेसद्वारे राबविला जात आहे. या कार्यक्रमात गोळा केल्या जाणाऱ्या गर्दीला 'जेन-झी' वयोमर्यादेची अट असतेच असे नाही. त्यामुळे केवळ गर्दीसाठी जमविल्या जाणाऱ्या सरसकट जमावासमोर राहुल गांधी यांनी संवादाच्या नावाखाली जे काही विचार मांडले, त्याचा फारसा प्रभाव तरुणाईच्या मनावर पडलेला दिसत नाहीच, उलट त्यांच्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमांच्या मालिकेनंतरही काँग्रेसच्या सावलीतील विद्यार्थी संघटनांनाच नाकारण्याची मानसिकता जेन-झी मध्ये बळावत असल्याचे अलिकडेच पार पडलेल्या दिल्ली विद्यापीठातील निवडणुकांच्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, राहुल गांधींना तरुणांसमोर आणून काँग्रेस मतांची बेगमी करते, की काँग्रेसपासून तरुणांनी दूर राहावे यासाठी आटापिटा करते, याचे उत्तर भविष्यात मिळणार आहे. राजकीय विरोधाला विनोदाची फोडणी देणे ही लोकशाहीने दिलेली मोकळीक आहे की राजकारणातील गांभीर्याचा ऱ्हास आहे, हा प्रश्न मध्य प्रदेशातील इंदूर येथे राहुल गांधी यांनी छात्रों की गूंज कार्यक्रमातील स्टँडअप कॉमेडियन पुलकित मणी याच्यासोबत झालेल्या 'हास्यजत्रे'मुळे ऐरणीवर आला आहे. एकमेकांचा अवमान आणि एखाद्याच्या पदाचा उपहास यांच्यामध्ये एक सूक्ष्म सीमारेषा असते. ती सीमारेषा पुसली गेली की राजकीय टीका अखेरीस तमाशाचा फड बनतो आणि व्यंगांची मर्यादा भंग होऊन ते केवळ स्वस्त विनोदाच्या पातळीवर उतरतात. इंदूरच्या राहुल गांधींच्या कार्यक्रमात नेमके हेच झाले, असा सत्ताधाऱ्यांचा आरोप आहे. ज्यांनी राहुल गांधी यांचा तो विनोदी कार्यक्रम पाहिला, प्रत्यक्ष अनुभवला, त्यांच्या मनातही याहून वेगळी भावना उमटली असेल असे नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लकबी, परदेशी नेत्यांसोबतच्या संवादाची शैली आणि काही शब्दांची खिल्ली यांचा आधार घेत इंदूरच्या कार्यक्रमात राहुल गांधी यांनी पुलकित होऊन सहभाग घेतला, तेव्हा लोकसभेतीलील विरोधी पक्षनेता या पदाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निश्चितच ऐरणीवर आला असेल. याआधीही एका जाहीर कार्यक्रमात राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांच्या संदर्भात अत्यंत घृणास्पद विनोद करून टीका केली तेव्हा जनतेमधील नापसंतीचा सूर बुहधा काँग्रेसपर्यंत पोहोचला नसावा. तसे असते, तर पुन्हा तसाच पांचट विनोद करून विद्यार्थ्यांना हसविण्याचा पोरकट प्रयत्न करण्याचा सल्ला राहुल गांधींच्या सल्लागारांनी त्यांना दिला नसता. आजची जेन-झी पिढी प्रगल्भ आहे, या पिढीच्या मनात व्यवस्थेविषयी काही स्पष्ट भावना आहेत आणि त्यामध्ये बदल घडविण्याचे ठोस मार्गदेखील त्यांच्यासमोर आहेत. अशा प्रगल्भ पिढीसमोर असे तिसऱ्या दर्जाचे हलके विनोद सादर करून त्यांद्वारे त्यांना आपलेसे करून घेण्याच्या प्रयत्नांत राजनीतीचे पतन आणि पक्षाच्या प्रतिमेवरील अविश्वासास हातभार लावण्यापलीकडे फारसे काही काँग्रेसच्या हाती लागण्याची शक्यता कमीच असतानाही, त्याच प्रकारांची पुनरावृत्ती करण्याचा अट्टहास ही विनाशकालातील विपरीत बुद्धी म्हणावी लागेल. काँग्रेसने राजनीतीची परंपरा जपली पाहिजे, त्या परंपरेला पोरकटपणाचाा स्पर्श होऊ देऊ नये आणि सभ्यतेच्या मर्यादा सांभाळल्या पाहिजेत, अशी भावना असलेले अनेक निष्ठावंत काँग्रेसजन राहुल गांधींच्या या स्टँडअप कॉमेडीमुळे नाराज झालेले पाहावयास मिळतात. त्यांची भावना पक्षापर्यंत पोहोचेल किंवा नाही, याबाबत काहीच स्पष्टता नाही. तशी काही यंत्रणा काँग्रेसकडे असेलच असे दिसत नाही. मुळात, राहुल गांधींच्या त्या वादग्रस्त मिमिक्रीचा वाद तेवढ्यापुरता मर्यादित नाही. राजकीय अभिव्यक्तीच्या बदलत्या संस्कृतीचा प्रश्न त्यामुळे ऐरणीवर आला आहे. राजकारणात विनोदास थारा नाही असे नाही. उलट सत्तेवर विनोद करणे हे राजकीय संस्कृतीच्या आणि लोकशाहीच्या आरोग्याचे लक्षण मानले जाते. व्यंग हा तर सत्तेला दाखविला जाणारा आरसा असतो. राजकारणातील व्यंगाची परंपरा फार प्रगल्भ आणि जुनी आहे. व्यंगचित्रकार, साहित्यिक, कवी, लेखक आणि विनोदी कलावंतांनी आपल्या उच्च दर्जाच्या विनोदातून राजकीय व्यंगावर बोट ठेणारे सुसंस्कृत विचार मांडले आहेत. ळपवळरप 'श्रिळींळली त्यामुळे, नव्या जमान्यातील मिमिक्री हा प्रकार राजकारणास निषिद्ध नसला, तरी व्यंगाचे सामर्थ्य त्याच्या आशयात असते, याचा विसर पडणे योग्य नाही. केवळ एखाद्याची देहबोली, आवाज किंवा लकबीतून त्यास हिणविणे म्हणजे विनोद नाही. धोरणांवर, निर्णयांवर, सत्तेच्या कार्यपद्धतीवर किंवा सार्वजनिक भूमिकांवर विनोद वा व्यंगाच्या माध्यमातून प्रहार झाले, तर ते धारदार शस्त्राप्रमाणे प्रभावी ठरतात. मात्र, व्यक्तीची थट्टा हाच विनोदाचा गाभा असेल, तर त्यातून दिल्या जाणाऱ्या राजकीय संदेशाविषयी संदेह निर्माण होतात. गेल्या काही वर्षांत अशा प्रकारच्या थट्टेचे प्रकार वाढीस लागले असून त्यामध्ये काँग्रेसने आघाडीवर राहण्याचा आटापिटा चालविला असावा असे दिसते. सुमारे तीन वर्षांपूर्वी तत्कालीन उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांच्या देहबोलीची थट्टा करणारी मिमिक्री तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी संसद परिसरातच सादर केली, तेव्हा त्यास भरभरून दाद देणाऱ्या काँग्रेस नेत्यांना या नीतीचे अनुकरण करण्याची कल्पना सुचली असावी. एखादे वैचारिक बौद्धिक किंवा धोरणात्मक चर्चा ऐकण्यासाठी लोकांना फारसा रस नसतो, मात्र काही सेकंदांचा विनोदी व्हिडीओ वेगाने समाजमाध्यमांवर व्हायरल होतो आणि लाखो लोकांपर्यंत पोहोचतो.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## चिमुकल्याने सोडवले आईच्या मृत्यूचे गूढ, चौकशी सुरु असताना एका व्यक्तीकडे बोट दाखवले अन्...

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : १६ सप्टेंबर रोजी पनवेल शहर पोलिसांना एका महिलेचा मृतदेह आढळला होता. मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून त्यावर माती आणि पोतं टाकून ठेवण्यात आली होती. पोलिसांसमोर सुरुवातीपासूनच खूप आव्हानं होती. महिलेची ओळख पटवण्यापासून पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. त्यानंतर मृत महिलेच्या बहिणीनेच तिची ओळख पटवली त्यानंतर पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. पण मृत महिलेच्या मुलामुळेच आरोपीला पकडण्यात यश आले आहे. पोलिसांनी गुन्ह्याची चौकशी सुरू केल्यानंतर मृत महिलेच्या मुलाने त्याच्या वडिलांकडे इशारा केला. तेव्हा पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत महिलेच्या पतीला चौकशीसाठी ताब्यात घेतले. तेव्हा पतीने केलेल्या मारहाणीत तिचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

# विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांसाठी तज्ज्ञ समिती गठित

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत 'दादा' पाटील यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तसेच विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भातील एकरूप परिनियमांच्या अनुषंगाने विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकांसाठी तज्ज्ञ समिती गठित केली असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

विद्यार्थी परिषद निवडणुकांशी संबंधित विविध बाबींचा सखोल अभ्यास करून शासनाला आवश्यक त्या उपाययोजना व शिफारशी सादर करण्याची जबाबदारी समितीवर सोपविण्यात आली आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे यांच्यासह विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील तज्ज्ञांचा समावेश आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे हे समितीचे सदस्य सचिव आहेत.

समितीमार्फत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ आणि विद्यार्थी परिषद निवडणुकांसाठी लागू असलेल्या एकरूप परिनियमांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक, सुलभ आणि गतिमान करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना सुचविणे, निवडणूक प्रक्रियेतील विविध घटकांबाबत योग्य नियमावली निश्चित करणे आणि पुढील दिशा ठरविणे, ही समितीची प्रमुख कार्ये आहेत.विद्यार्थी परिषदेमध्ये महिला, अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय तसेच इतर मागासवर्ग आणि , , क्रीडा व सांस्कृतिक विभागांना योग्य व प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व मिळण्यासाठी धोरणात्मक शिफारसी करण्याचे निर्देशही समितीला देण्यात आले आहेत.

तसेच, विद्यार्थी परिषद निवडणुकांमध्ये



कोणत्याही स्वरूपाचा बाह्य राजकीय हस्तक्षेप अथवा निवडणुकांचे व्यापारीकरण होऊ नये, यासाठी कडक नियमावली व उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. विद्यार्थी परिषदेच्या निधी, अंदाजपत्रक व खर्चाचे व्यवस्थापन तसेच वेळेत लेखापरीक्षण पारदर्शकपणे होण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे कामही समिती करणार आहे.

नव्याने निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींना त्यांचे अधिकार, कर्तव्ये, कार्यपद्धती आणि विद्यापीठ अथवा महाविद्यालयीन प्रशासनाशी संबंधित बाबींची माहिती मिळावी, यासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन राबविण्याबाबतही समिती शिफारसी करणार आहे. नामनिर्देशन, छानणी, मतदान आणि तक्रार निवारण प्रक्रियेत आवश्यकतेनुसार डिजिटल अथवा ऑनलाइन प्रणालीचा वापर करण्याबाबतही अभ्यास करून अहवाल सादर केला जाणार आहे. समिती आपले निष्कर्ष व शिफारसी एक महिन्याच्या आत शासनाला अहवालाद्वारे सादर करेल, असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

# गणरायाच्या दर्शनासोबत योजनांचा जागर!

## लोकसंवाद-२०२६'मधून शेगावात कृषी, आरोग्य, महिला-बालविकास व महसूल योजनांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** गणरायाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना यंदा केवळ आशीर्वादच नव्हे, तर शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहितीही मिळाली. 'गणरायाचे दर्शन आणि योजनांची माहिती' या अभिनव संकल्पनेतून जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाला शेगाव येथील श्री छत्रपती शिवाजी क्लब गणेश मंडळात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्याने मंडळांच्या परिसरात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत आहेत. या संधीचा उपयोग करून शासनाच्या योजना, सुविधा आणि विविध लोककल्याणकारी उपक्रमांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम जिल्हा माहिती कार्यालयाने हाती घेतला आहे.

शेगाव येथील कार्यक्रमात कृषी, महिला व बालविकास, आरोग्य तसेच महसूल विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. कृषी विभागाचे उपविभागीय कृषी अधिकारी धनंजय



देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, उपलब्ध सुविधा आणि योजनांचा लाभ घेण्यासाठीची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महिला व बाल विकास पर्यवेक्षक शुभांगी जाधव यांनी महिला व बालकांच्या संरक्षणासाठी असलेले कायदे, शासनाच्या विविध योजना तसेच उपलब्ध सुविधांची माहिती दिली. समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत जोशी यांनी नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व समुपदेशन केले.

नायब तहसीलदार विजय सुरडकर व ऋतुजा पारखे यांनी महसूल विभागाच्या विविध लोककल्याणकारी उपक्रमांची माहिती दिली. यावेळी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता, महत्त्वाची कागदपत्रे, ऑनलाइन व ऑफलाइन अर्ज प्रक्रिया आणि संबंधित विभागाशी संपर्क साधण्याची पद्धत याबाबतही नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

गणेश मंडळाचा परिसर केवळ धार्मिक उत्सवाचे केंद्र न राहता शासनाच्या योजनांची माहिती मिळविण्याचे व्यासपीठ ठरल्याने नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. विशेषतः शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांनी विविध योजनांबाबत उत्सुकतेने माहिती जाणून घेतली. गावपातळीवरच शासनाच्या योजनांची माहिती उपलब्ध झाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

'योजना समजून घ्या, पात्रतेनुसार लाभ घ्या' या उद्देशाने सर्व पात्र नागरिकांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन उपलब्ध सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास कृषी विभागाचे उपविभागीय कृषी अधिकारी धनंजय देशमुख, महिला व बाल विकास पर्यवेक्षक शुभांगी जाधव, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत जोशी, नायब तहसीलदार विजय सुरडकर, ऋतुजा पारखे, ह.भ.प. संतोष महाराज वसत्कार, लोकमतचे तालुका प्रतिनिधी अनिलभाऊ उंबरकर, दैनिक दिव्य मराठीचे ज्येष्ठ पत्रकार धनराज ससाने, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे महेंद्र मिश्रा, मंडळाचे अध्यक्ष वरुण नागपाल, संस्थापक सदस्य कमलाकर चव्हाण, जिल्हा माहिती कार्यालयाचे जयंत वानखडे, उप माहिती कार्यालयाचे ललितकुमार ढोकणे तसेच मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

## स्लीपर एसी बसला लागलेल्या भीषण आगीत ९ जण जिवंत जळाले, मृतांची ओळख पटवणं सुद्धा अवघड; २० जणांचा जीव वाचवला

नोएडा : उत्तर प्रदेशातील नोएडा येथे यमुना एक्सप्रेसवेवर एका स्लीपर एसी बसला आग लागली. या अपघातात नऊ प्रवासी जिवंत जळाले. यामध्ये आठ पुरुष आणि एका महिलेचा समावेश होता. बसमध्ये ३५ प्रवासी होते. अनेक प्रवाशांनी खिडक्या फोडून आणि बाहेर उडी मारून स्वत:चा जीव वाचवला, तर इतर २० जणांना वाचवण्यात आले. मृतदेह खूप जळाले होते आणि त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. हा अपघात बुधवारी रात्री साडे अकराच्या सुमारास जेवर विमानतळापासून ५०० मीटर अंतरावर घडला. ही बस दिल्लीच्या काश्मिरी गेटवरून महोबासाठी निघाली होती. सीएफओ प्रदीप कुमार यांनी सांगितले की, प्राथमिक तपासानुसार एसी इंजिनमधील ठिणगी किंवा स्फोटामुळे आग लागली. अग्निशमन दलाची पाच वाहने घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी ४५ मिनिटांत आग विझवली. अग्निशमन दलाच्या जवानांनी बसमध्ये प्रवेश करण्यासाठी स्लीपर बसचा मागील भाग कापला आणि एकेक करून मृतदेह बाहेर काढले. बचावकार्य सुमारे दोन तास चालले. आग इतकी भीषण होती की बस पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती. ही बस मध्य प्रदेशातील राज कल्पना ट्रॅव्हल्सची आहे.

## मराठमोळ्या अभिनेत्री सैयामी खेरची आयर्नमॅनमध्ये हॅट्ट्रिक; इटलीत रचला इतिहास...

हैदराबाद : अभिनेत्री आणि फिटनेसची आवड असलेली मराठमोळ्या सैयामी खेरनं तिची तिसरी आयर्नमॅन ७०.३ ( ७०.३) स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. इटलीतील या शर्यतीपूर्वीचा दोन महिन्यांचा कठीण काळ, प्रवासातील गोंधळ, प्रचंड उष्णता आणि जेलीफिशचा सामना केल्यानंतर, तिनं या शर्यतीला आतापर्यंतची सर्वात कठीण शर्यत असं म्हटलंय.

सैयामी खेरनं रचला इतिहास : सैयामीनं या आव्हानाचा स्वीकार सर्वप्रथम २०२४मध्ये जर्मनीतील एर्कनर-ब्रँडेनबर्ग येथील आयर्नमॅन ७०.३ स्पर्धेतून केला आणि तिनं शर्यत पूर्ण केली. त्यानंतर जुलै २०२५मध्ये स्वीडनमधील जोंकोपिंग येथे तिनं आपली दुसरी आयर्नमॅन ७०.३ स्पर्धा पूर्ण केली. अशा प्रकारे, ही एन्ड्युरन्स (सहनशक्तीची) शर्यत दोनदा यशस्वीरीत्या पूर्ण करणारी ती पहिली भारतीय अभिनेत्री ठरली. शर्यतीतील काही क्षण शेअर करताना सैयामीनं सांगितलं की, तिनं मागील ७०.३ शर्यतीच्या तुलनेत, २० मिनिटे कमी वेळात ही शर्यत पूर्ण केली.

हॅट्ट्रिक पूर्ण : तिनं लिहिलं, ३ आयर्नमॅन ७०.३ हॅट्ट्रिक पूर्ण झाली. कदाचित ही आतापर्यंतची सर्वात कठीण शर्यत होती. शर्यतीपूर्वीचे दोन महिने खूप कठीण गेले. माझ्या आणि शर्यतींच्या बाबतीत बोलायचं झालं तर ड्रामा किंवा गोंधळाची कधीच कमतरता नसते. एका विमान कंपनीनं, आम्हाला विमानात चढण्यापासून रोखले, कारण त्यांच्याकडून चूक झाली होती, त्यांच्या सिस्टीममध्ये आमच्या बाईक बॅग्जची नोंद अपडेट केली गेली नव्हती. शर्यतीला काही दिवस बाकी असताना तासनतास फोनवर बोलणं, अनिश्चितता आणि तणाव यांचा सामना करावा लागला. आम्ही अखेरीस इटलीला पोहोचलो, पण तिथे ३० अंश सेल्सिअस तापमानानं आमचे स्वागत केले. प्रचंड उष्णतेचा दिवस, जेलीफिशनं भरलेला समुद्र आणि आधीच खूप थकलेले शरीर... पण त्या गोंधळात, उष्णतेत आणि जेलीफिशच्या दरम्यान, मला लढण्याची नवी उमेद सापडली.

# गणेश विसर्जन करतांना सावधगिरी बाळगा, प्रशासनाच्या नियमांचे पालन करावे



गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे.त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.कारण गणपती विसर्जन करतांना नदी,तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत आपल्या चुकांनमुळे दुर्घटना होऊ शकते याला नाकारता येत नाही आणि अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.

मागील वर्षी राज्यभरात वेगवेगळ्या जिल्ह्यात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला.त्यामुळे गणेश विसर्जन करतांना सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन (नदी,तलाव,विहीर, समुद्र किनारा) यापासून दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक संपूर्ण परिवारावर मोठा आघात करू शकते.कारण खेड्यापाड्यात,शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात. अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढावून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.

गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच.परंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण(स्थळ) दिले आहे किंवा प्रशासनाने बनवीलेल्या कृत्रिम तलाव यामध्ये विसर्जन करायला हवे. यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते.त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सर्वानी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी.कारण आपण अनेकदा पाहिले व ऐकले सुध्दा आहे की मुर्ति विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत.या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे.

त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.ज्या-ज्या ठीकाणी कृत्रीम तलाव (आर्टीफीशीयल टँक) ची व्यवस्था केलेली आहे, त्या-त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे.

परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी,विहीर, समुद्र किनारा,किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करतात त्या-त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे. मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात.अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे.कारण छोटीशी चुक मोठा आघात पोहचवु शकते याला नाकारता येत नाही आणि याचे दुःख संपूर्ण परिवाराला व मंडळाला भोगावे लागते.गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे ''निर्माल्य'' तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या-ज्या ठिकाणी केली आहे त्या-त्या ठिकाणीच टाकावे.यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल.

अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे.गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार व विराजमान होणारच.कारण गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या!असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो. परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा.

अशा पध्दतीने गणपती बाप्पाच्या नावाने राज्यात दरवर्षी हजारो झाडांची लागवड अवश्य होईल यामुळे गुरांना चारा,सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे. कारण गणपती बाप्पासह संपूर्ण देवीदेवतांचे वास्तव्य निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे त्यामुळे बदलते हवामान व अलनिनोचा प्रभाव लक्षात घेता वृक्षलागवड मानव कल्याणासाठी व पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतूंना आणि निसर्ग प्रफुल्लित करण्यासाठी प्रत्येक सणांना वृक्ष लागवड व्हायलाच हवी.बाप्पाला निरोप देतांना आपण सर्व भक्तगण साकडे घालूया येणाऱ्या दुष्काळापासुन बळीराजाला वाचवा.''गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या'' जय श्री गणेशाय नमः!



लेखक
**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# दुष्काळाबाबत मदतीचा आदेश उद्याच काढणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अमरावती विमानतळ येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला

**अमरावती । प्रतिनिधी :** अमरावती विभागात सर्व जिल्ह्यांत दुष्काळाची झळ पोहोचली आहे. यामुळे पिके संकटात आली आहेत. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून या भागाचा दौरा केला आहे. शेतकऱ्यांना तातडीने मदत व्हावी, यासाठी दुष्काळाच्या संहितेच्या 'ट्रिगर-१'नुसार देण्यात येणाऱ्या मदतीचा आदेश उद्याच काढण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वाशिम येथील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासमवेत अमरावती विमानतळ येथे चर्चा केली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य शासनाकडून तातडीने मदत देण्यात



येईल. तसेच केंद्राच्या मदतीसाठी आवश्यक असणारे पंचनामे आदी प्रक्रिया पूर्ण करून मदतीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येईल.

शेतकऱ्यांसाठी मदतीचा आदेश तातडीने काढणे गरजेचे आहे. सर्वच भागात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ असल्याने मदत करण्यात येणार आहे.

येत्या काळात चाराटंचाई, पाणीटंचाईबाबत उपाययोजना करून अन्नधान्याचीही मदत करावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी थेट मदत करण्यात येईल.

रब्बीमध्ये काही ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्यावर पिके घेण्याबाबत तपासणी करण्यात येईल. तसेच रब्बी पिके घेण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल. तसेच, रोजगार उपलब्ध होण्यासाठी जलसंधारणाच्या कामावर भर देण्यात येईल. जलसाठे आटलेले असल्यामुळे त्यातील गाळ काढणे, जलतारा स्ट्रक्चर उभारणे, तसेच दुरुस्ती करणे आवश्यक असलेले तलाव शोधून त्यांची दुरुस्ती करण्यात येईल.

सर्वदूर पिकांची परिस्थिती सारखीच असल्यामुळे राज्य शासनाने मदतीचे धोरण आखले आहे. शेतकऱ्यांना करण्यात येणारी ही मदत दिवाळीपूर्वी मिळेल, याचे नियोजन केले जाईल. राज्य शासनाने कर्जमाफी केली असून कर्जाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांना नियमाप्रमाणे कर्ज द्यावेच लागेल. त्यासोबतच शेतमालाची शासकीय दराने खरेदी केली जाईल. यासाठी लवकरच नोंदणी सुरू केली जाईल.

जिल्हा शासकीय रुग्णालयात लागलेल्या आगीचा अहवाल सार्वजनिक केला जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# बळीराजाच्या हक्कासाठी आ. सिद्धार्थ खरात मैदानात!

## ३० सप्टेंबरच्या खामगाव आक्रोश मोर्चासाठी मतदारसंघनिहाय झंझावाती तयारी

## खामगाव, जळगाव जामोद व नांदुरात बैठकांचा धडाका

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ३० सप्टेंबर रोजी खामगाव येथील अपर जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या तयारीसाठी जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदारसंघांत नियोजन बैठका सुरू असून, संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर मेहकर मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी बैठकींना उपस्थित राहून पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत मोर्चासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

बुलढाणा जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतकऱ्यांना एकरी २५ हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी, तसेच पीकविमा, कर्जमाफी आणि शेतकऱ्यांच्या इतर प्रलंबित प्रश्नांवर शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, या मागण्यांसाठी हा आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला आहे.





शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पुढाकाराने होणाऱ्या या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर खामगाव, जळगाव जामोद आणि नांदुरा येथे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका पार पडल्या. प्रत्येक बैठकीत आमदार सिद्धार्थ खरात यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भूमिका मांडत मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी व शिवसैनिक सहभागी होण्याचे आवाहन केले.

तिन्ही विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक शिवसेना सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने यांच्या संपर्क कार्यालयात झाली. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात व जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर यांनी मार्गदर्शन केले. ''खामगाव येथील आक्रोश मोर्चात मतदारसंघातील शेतकरी व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन आमदार खरात यांनी केले.

यावेळी नांदुरा येथील नियोजन बैठकीदरम्यान जिल्हा सहसंपर्कप्रमुख वसंतराव भोजने, उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, मलकापूर तालुकाप्रमुख दीपक चांभारे, शहरप्रमुख हरिदास गणबास, नांदुरा तालुकाप्रमुख ईश्वर पांडव, उपतालुकाप्रमुख विष्णू धोरण, अल्पसंख्याक सेना उपजिल्हाप्रमुख सै. वसीम सै. रहीम यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बाळू ठाकरे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. आमदार सिद्धार्थ खरात यांनी भगवा दुपट्टा घालून त्यांचे स्वागत केले.

खामगाव येथील नियोजन बैठकीतही आमदार खरात यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत मोर्चाच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी उपजिल्हाप्रमुख बाबा काळे, तालुकाप्रमुख श्रीराम खेलदार, संघटक विजय बोदडे, शहरप्रमुख रवी जैन, किसान सेना तालुकाप्रमुख निलेश पारस्कर, अल्पसंख्याक उपतालुकाप्रमुख युसुफ खान, युवासेना उपतालुकाप्रमुख नितीन जाधव, प्रकाश पवार, उपतालुकाप्रमुख दिनेश देशमुख, भगवान भिसे, प्रमोद धुळधर, किशोर भुतकर, वामन बोचरे, नंद रोटे, रमेश भिसे पाटील, विजय क्षीरसागर, मोहन राठोड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जळगाव जामोद व नांदुरा परिसरातील बैठकींमध्येही मोर्चाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली. यावेळी पुंडलिक पाटील, विजय मारोडे, जनार्दन कराळे, शहरप्रमुख रमेश ताडे, माजी शहरप्रमुख कैलास राजपूत, युवासेनेचे संकेत रहाटे, विशाल पाटील, पंकज मिसाळ, डॉ. प्रशांत इंगळे यांच्यासह विविध अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधव उपस्थित होते. पावसातील खंडामुळे खरीप पिकांवर परिणाम झाल्याने शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेल्या अडचणींचाही बैठकीत ऊहापोह करण्यात आला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ३० सप्टेंबरचा मोर्चा व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. दरम्यान, शिवसेना उपनेते आमदार नितीन बापू देशमुख व जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आक्रोश मोर्चाच्या यशस्वीतेसाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विविध भागांत पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संपर्क साधत नियोजनाला गती दिली आहे. त्यामुळे ३० सप्टेंबरच्या खामगाव मोर्चाकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## आदर्श आचारसंहितेमुळे नियोजित रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-२०२६ स्थगित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जिल्ह्यातील रोजगार इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा यांच्या वतीने २९ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात नियोजित करण्यात आलेला 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-२०२६' आदर्श आचारसंहितेमुळे स्थगित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता जिल्ह्यात लागू झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १३ ठिकाणी नियोजित रोजगार मेळावे स्थगित करून पुढे ढकलण्यात आले आहेत. या मेळाव्यांच्या पुढील तारखेबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे.

स्थगित करण्यात आलेल्या मेळाव्यांमध्ये बुलढाणा येथील मॉडेल डिग्री महाविद्यालय, चिखली येथील श्री शिवाजी महाविद्यालय, खामगाव येथील शासकीय तंत्रनिकेतन व सिद्धीविनायक टेक्निकल कॅम्पस, मलकापूर येथील जनता कला व वाणिज्य महाविद्यालय, मेहकर येथील एम.ई.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, लोणार येथील भगवानबाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा येथील के.बी.जे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगाव येथील सरस्वती कॉलेज, नांदुरा येथील श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, जळगाव जामोद येथील श्रीपाद कृष्णा कोल्हटकर महाविद्यालय आणि सिंदखेड राजा येथील राजमाता पॅरामेडिकल कॉलेज यांचा समावेश आहे.

रोजगार इच्छुक उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे यांनी केले आहे.

## स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांची ९३ वी जयंती जिल्हा कार्यालयात साजरी करण्याचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांची ९३ वी जयंती २५ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये साजरी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना निमंत्रित करण्यात यावे. कार्यक्रमात स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात यावे. तसेच त्यांनी केलेले सामाजिक कार्य, माथाडी कामगार चळवळीतील योगदान आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याची माहिती उपस्थितांना देण्यात यावी.

प्रत्येक जिल्हा समन्वयकाने संबंधित जिल्हा माहिती अधिकाऱ्यांशी समन्वय साधून कार्यक्रमाची प्रसिद्धी स्थानिक वृत्तपत्रांमधून करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती, तालुकानिहाय लाभार्थी संख्या तसेच वितरित करण्यात आलेल्या व्याज परताव्याची रक्कम याबाबतची माहिती प्रसिद्धीसाठी उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

कार्यक्रमाचे आयोजन काटेकोर नियोजन व योग्य पद्धतीने करण्यात यावे. कार्यक्रमानंतर छायाचित्रे, प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची वृत्तपत्र कात्रणे, लाभार्थ्यांची माहिती तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल संबंधित विभागीय समन्वयकांमार्फत महामंडळाच्या मुख्यालयास ई-मेलद्वारे सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हा समन्वयकांनी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी विशेष दक्षता घ्यावी, तसेच संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय राहील याची खात्री करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

## २८ सप्टेंबरला 'माहिती अधिकार दिन'; शासकीय कामकाजातील पारदर्शकतेसाठी जनजागृती उपक्रम

**बुलढाणा । प्रतिनिधी :** नागरिकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याबाबत माहिती व्हावी, तसेच शासकीय कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढावे, या उद्देशाने २८ सप्टेंबर २०२६ रोजी 'माहिती अधिकार दिन' साजरा करण्यात येणार आहे. या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये माहिती अधिकाराबाबत जनजागृतीपर उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

या उपक्रमांद्वारे नागरिकांना माहितीचा अधिकार, माहिती मिळविण्यासाठी अर्ज करण्याची पद्धत, अर्जावरील कार्यवाही, माहिती प्राप्त करण्याची प्रक्रिया तसेच कायद्यान्वये नागरिकांना प्राप्त असलेल्या अधिकारांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

माहिती अधिकार दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावी, यासाठी सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांनी आपल्या स्तरावरून स्थानिक वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे तसेच उपलब्ध अन्य माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी महाडीबीटीवर अर्ज करावेत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला कार्यालयाच्या अधिनस्त अकोला, वाशिम व बुलढाणा या तीन जिल्ह्यांतील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित, कायम विनाअनुदानित व मान्यता प्राप्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती तसेच इतर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक सत्रासाठी चरहरउ्रद्ढ प्रणालीवर नवीन अर्ज तसेच नूतनीकरणाचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज चरहरउ्रद्ढ पोर्टलवर भरता येणार आहेत.

या योजनांसाठी ११ वी, १२ वी, B.A., B.Com., B.Sc., M.A., M.Com., M.Sc., BSW, MSW, B.Lib., M.Lib., ANM, GNM, D.Ed., B.Ed., M.Ed. आदी मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेले विद्यार्थी पात्र आहेत. तसेच उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनाही योजनेचा लाभ घेता येणार आहे.

आवश्यक कागदपत्रांमध्ये बोनाफाईड प्रमाणपत्र, जातीचा दाखला, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रिका तसेच संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक जात वैधता प्रमाणपत्र आदी कागदपत्रांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांनी योजनेची कार्यपद्धती व इतर माहिती जाणून घेण्यासाठी शासनाच्या संकेतस्थळावरील आदिवासी विकास विभागाचा १७ जानेवारी २०२२ रोजीचा शासन निर्णय पाहावा. तसेच शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व अर्जाच्या कालमर्यादेचे पालन करावे.

MahaDBT पोर्टल : mahadbt2.maharashtra.gov.in

अर्ज व शिष्यवृत्तीबाबत अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोलाचे प्रकल्प अधिकारी मोहनकुमार ग. व्यवहारे यांनी केले आहे.

## 'कसं काय?' मोहिमेंतर्गत मडाखेड येथे प्राथमिक आरोग्य सेवेसाठी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**बुलढाणा। प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत 'कसं काय?' मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मडाखेड, ता. जळगाव जामोद येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात समग्र प्राथमिक आरोग्य सेवा विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा २१ व २२ सप्टेंबर २०२६ रोजी घेण्यात आली.

ग्रामीण नागरिकांना गावाजवळच गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे तसेच 'अधिक उपचार, कमी रेफरल' ही संकल्पना प्रभावीपणे राबविणे, हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजित मंडले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. निलेश जाधव आणि जिल्हा प्रशिक्षण केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा पाटील यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेत माता-बाल व किशोरवयीन आरोग्य, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध, निदान व उपचार, मानसिक आरोग्य, वृद्धांची आरोग्य सेवा, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, आयुष उपचार पद्धती, आरोग्य शिक्षण व समुदायस्तरीय आरोग्य व्यवस्थापन आदी विषयांवर सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. तसेच गर्भवती व प्रसूतिपश्चात मातांची काळजी, नवजात व बाल आरोग्य, आजारांचे लवकर निदान, आवश्यक संदर्भ सेवा आणि गावपातळीवरील आरोग्य उपक्रमांचे प्रभावी नियोजन याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षक म्हणून डॉ. शिवानंद शिंगाडे, डॉ. संतोष सांगळे, डॉ. शैलेश खंडारे, डॉ. जीवन भारती, सुवर्णा बेलसरे, स्वाती शेळे, कविता खाडे, सुनीता जंबाळे व सलोचना फगाड यांनी मार्गदर्शन केले.कार्यशाळेत तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवदास कदम, डॉ. सोनाली सातव, डॉ. रोशन येनकर, डॉ. प्राजक्ता देशमुख, डॉ. चांडक, आरोग्य सहाय्यक सुनील लोखंडे यांच्यासह समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक-सेविका, एएनएम, एमपीडब्ल्यू, गटप्रवर्तक, आशा समन्वयक व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, गावपातळीवर नागरिकांना वेळेत आवश्यक उपचार उपलब्ध करून देणे आणि आरोग्य सेवेची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने या प्रशिक्षण कार्यशाळेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

# पातुरकर विद्यालयाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत 'मुख्यमंत्री' देखाव्याने वेधले सर्वांचे लक्ष

## महाराष्ट्राच्या वैभवशाली प्रवासाचे विद्यार्थ्यांकडून प्रभावी सादरीकरण; ध्वनीप्रदूषणमुक्त गणेशोत्सवातून सामाजिक प्रबोधनाचा संदेश







दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव । प्रतिनिधी :** शिक्षण प्रसारक मंडळ, चिखलीद्वारा संचालित डोणगाव, ता. मेहकर येथील मदन वामन पातुरकर विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मीकांत शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तिमय वातावरणात श्री गणरायाची स्थापना करण्यात आली होती.

गणेशोत्सवाच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक प्रबोधनाचा संदेश दिला. अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी २४ सप्टेंबर विद्यालयाच्या वतीने डोणगाव नगरीतून ध्वनीप्रदूषणमुक्त व भक्तिमय वातावरणात गणेश विसर्जन जनजागृती रॅली काढण्यात आली. डीजे अथवा मोठ्या आवाजातील साऊंड सिस्टिमचा वापर न करता टाळ-मृदंगाच्या गजरात आणि गणरायाच्या जयघोषात निघालेल्या या रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. धार्मिक वातावरणासोबतच विविध सामाजिक विषयांवर जनजागृती करणारे देखावे विद्यार्थ्यांनी सादर केले.

मुख्यमंत्री देखाव्याने घेतले विशेष लक्ष या रॅलीतील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला स्वातंत्र्यकाळापासून आजपर्यंतचा महाराष्ट्राचा वैभवशाली प्रवास हा देखावा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. वर्गशिक्षिका प्रा. पाटील मॅडम तसेच मार्गदर्शक सुर्वे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक व विकासात्मक वाटचालीचे विविध टप्पे प्रभावीपणे साकारले. या देखाव्यामध्ये मुख्यमंत्री म्हणून विद्यार्थ्याने साकारलेली भूमिका विशेष लक्षवेधी ठरली.

महाराष्ट्राच्या विकासात विविध नेतृत्वांनी बजावलेली भूमिका, राज्याची बदलती वाटचाल आणि आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती यांचे चित्रण विद्यार्थ्यांनी देखाव्याच्या माध्यमातून केले. त्यामुळे हा देखावा पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांची गर्दी झाली होती. विद्यार्थ्यांनी इतिहास आणि वर्तमानाचा मेळ घालत सादर केलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

रॅलीदरम्यान सामाजिक सलोखा, पर्यावरण संवर्धन, ध्वनीप्रदूषण टाळणे, स्वच्छता आणि जबाबदार नागरिकत्व यांसारखे संदेशही देण्यात आले. त्यामुळे पातुरकर विद्यालयाच्या गणेशोत्सवाला केवळ धार्मिक स्वरूप न राहता विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवा आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ देणारा उपक्रम म्हणून विशेष महत्त्व प्राप्त झाले.



या गणेश विसर्जन मिरवणुकीस संस्थेचे संचालक गोपाल बोरा, स्थानिक सल्लागार राजकुमार सारडा, सुनील बियाणी, गजानन चव्हाण यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक विजय अजमिरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. दरम्यान, डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय अजमिरे यांनी मिरवणुकीदरम्यान चोख पोलीस बंदोबस्त ठेवला. भक्ती, संस्कृती, सामाजिक प्रबोधन आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा सुंदर संगम घडविणारी ही मिरवणूक डोणगावकरांच्या स्मरणात राहणारी ठरली.